क्रमांक-जाहिरात/ई-टेंडर/२०१३/का-५/ ४९३
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई
दिनांक 23 MAY 2013

# परिपत्रक

रुपये दहा लाख किंवा त्यापेक्षा अधिक मुल्यांच्या निविदांसाठी ई–निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करण्यासाठी मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली लेखा व कोषागार संचालनालयातील सर्व कोषागार अधिकारी आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सर्व जिल्हा माहिती अधिकारी यांची व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे दि. १५एप्रिल, २०१३ रोजी दु. १२.१५ वाजता बैठक झाली. तसेच दि. १५.५.२०१३ रोजी यासंबंधी व्हिडीओ कॉन्फरन्सींद्वारे आढावा बैठक झाली.

दि. १५ .४.२०१३ च्या बैठकीस माहिती व तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव तसेच सचिव, लेखा व प्रशिक्षण, महासंचालक, माहिती व जनसंपर्क इ. अधिकारी उपस्थित होते. याबैठकीत मा. मुख्य सचिव महोदयांनी तसेच उपस्थित अधिकाऱ्यांनी ई निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करण्याकरिता पुढीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

१. रु. १० लाख किंवा त्यापेक्षा अधिक मुल्यांच्या निविदांसाठी ई निविदा कार्यप्रणालीचा अवलब करणे अनिवार्य आहे. अशा प्रकारे ई निविदा करण्यात आल्यासंबंधी संक्षिप्त जाहिरात ज्यामध्ये संबंधित ई–निविदेची माहिती असेल अशी जाहिरात वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध करता येईल. याकरिता संपूर्ण ई निविदेची जाहिरात वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे अपेक्षित नाही. (सोबत शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने संमत केलेला नमुना जोडला आहे.)

२४०८/जा
२३/५/१३

२. ज्या विभागाची उपरोल्लेखित मुल्याची निविदा ई–निविदा प्रणालीचा अवलंब करुन प्रसिद्ध झालेली नाही त्यासंबंधी जाहिरात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संबंधित कार्यालयांकडून प्रसिद्ध करण्यात येऊ नये अशी सूचना देण्यात आली आहे.

३. ई निविदा प्रसिद्ध करताना संबंधित विभाग जाहिरातीत ज्या संकेतस्थळांचा उल्लेख करतात ते e proeurement/e Tendering पोर्टल नसते, असे शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या निदर्शनास आलेले आहे. तेव्हा ई टेडरिंगसाठी योग्य ई टेडरिंग पोर्टलचा वापर करण्याबाबत संबंधित विभागांनी खात्री करुन घ्यावी आणि फक्त अशा संकेतस्थळांचा तपशील निविदा सूचनेत देण्यात यावा, अशी माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या सूचना आहेत.



→

३.	या बैठकीच्या अनुषंगाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालय व अधिपत्याखालील सर्व संचालक/विभागीय माहिती उपसंचालक/जिल्हा माहिती अधिकारी यांना कळविण्यात येते की, त्यानी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. जाहिरात२००९/प्र.क्र.१३७/का-३४ यातील नियम (१२) अन्वये विहित केलेल्या जाहिरातीतील मूल्यमर्यादा विचारात घेऊन त्यांच्या स्तरावर जाहिरात वितरण करावे व वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, नगरपालिका/नगरपरिषदा/महामंडळे/मंडळे इत्यादी स्वायत्त संस्था यांच्या कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

**संचालक (माहिती)(वृत्त व जनसंपर्क)**

सहपत्र : **ई निविदा संक्षिप्त जाहिरातीचा नमुना**

**प्रति,**

१. संचालक (माहिती)(प्रशासन) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नागपूर-अमरावती विभाग, नागपूर
३. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मराठवाड विभाग, औरंगाबाद
४. उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. उपसंचालक (प्रदर्शने) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६. उपसंचालक (प्रकाशने) माहिती व जनसंपर्क महासंचालनलाय, मंत्रालय, मुंबई.
७. उपसंचालक (लेखा) माहिती व जनसंपर्क महासंचालनलाय, मंत्रालय, मुंबई.
८. उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, नाशिक, पुणे, कोल्हापूर, कोकण, लातूर, अमरावती.
९. उपसंचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली.
१०. सर्व जिल्हा माहिती अधिकारी
११. वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी गोवा
१२. वरिष्ठ सहाय्यक संचालक (जाहिरात/प्रशासन),
१३. सहायक संचालक (जाहिरात/प्रशासन)
१४. अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने, मुंबई
१५. निवड नस्ती

**प्रत सादर अग्रेषित :**

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. मा. उप मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (का-३४), मंत्रालय, मुंबई
३ मा. सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई
३. मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

**एफ/महाडीक/परिपत्रक**

# ई–निविदा संक्षिप्त जाहिरातींचा नमुना

विभागाचे/कार्यालयाचे नाव

ई निविदा मागविणारी सूचना

..................हे ..............करिता मोहोरबंद निविदा मागवित आहेत.

कामाचे संक्षिप्त वर्णन

निविदा शुल्क

निविदा उघडण्याची तारीख व वेळ

१. निविदा कागदपत्रांचा तपशील ........... या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदाकारांनी खात्री करुन घ्यावी की त्यांनी निविदा कागदपत्रे, शुल्क आणि .......... यांच्या नावे डी.डी./आय.पी.ओ. च्या स्वरुपात सादर केली आहे.

२. निविदाकारांनी त्यांच्या बोली ऑनलाईन / इलेक्ट्रॉनिक पध्दतीने सादर कराव्यात.

३. निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारांनी क्लास III डिजिटल सिगनेचर आणि वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ...........करिता स्वत: नाव नोंदणी करुन घ्यावी.

४. कोणत्याही स्पष्टीकरणाकरिता निविदाकारांनी दूरध्वनी क्रमांक ............ शी संपर्क साधावा.

५. पत्रव्यवहाराकरिता संपर्क व्यक्ती व पत्ता

............................................

..............................................

फॅक्स क्रमांक

दूरध्वनी क्रमांक

ई मेल पत्ता

(जाहिरात देणारा)
पदनाम, कार्यालय / विभाग

एफ/महाडीक/परिपत्रक